नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २३/१२/२०२५ (मंगळवार )

# नागपूर ग्रामीण जिल्हयात सन २०२४ च्या तुलनेत सन २०२५ मध्ये रस्ते अपघातातील मृत्यूंच्या संख्येत झाली घट तसेच जखमींच्या संख्येत झाली लक्षणीय घट

नागपूर ग्रामीण जिल्हयात जानेवारी ते नोव्हेंबर सन २०२४ च्या तुलनेत जानेवारी ते नोव्हेंबर सन २०२५ मध्ये रस्ते अपघातात मृत्यूंच्या संख्येत घट झाली असुन जखमींची संख्येत लक्षणीय घट झाली आहे. मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात जिल्हा प्रशासन आणि सेव्ह लाईफ फाउंडेशन या संस्थे सोबत Zero Fatality District (ZFD) उपक्रम राबविण्यात येत आहे. सदर उपक्रमा अंतर्गत रस्ते अपघातास आळा बसविण्यासाठीच्या उपाययोजना सतत रावबिण्यात येत आहे.

**सन २०२५ मध्ये नागपुर ग्रामीण पोलीसांनी कुंभमेळा कडे जाणारे भाविकांच्या गर्दीचे योग्य नियोजन केले. कुंभ मेळयाच्या कालावधीत कुंभमेळा कडे जणारे लाखो भाविकांची गर्दी असतांनाही, पोलीसांच्या कडक सुरक्षा व्यवस्थेमुळे तसेच अतिशय वेगाने वाहन चालविणारे, इतर धोकादायक वाहन चालक, मदयपान करून वाहन चालविणाऱ्यांवर सतत कारवाई केल्यामुळे कोणतीही मोठी दुर्घटना घडली नाही. तसेच दिर्घकालीन असलेला पावसाळा आणि अतिवृष्टीत अपघात टाळण्यासाठी नागपुर ग्रामीण पोलीसांनी सतत निरीक्षण करून उपाययोजना केल्या. पोलीसांनी केलेले वाहतूक नियंत्रण आणि तसेच रस्ते सुरक्षा जनजागृती मोहिमांमुळे रस्ते अपघातांना आळा बसला. एकूणच सन २०२४ च्या तुलनेत सन २०२५ मध्ये रस्ते अपघातातील जखमींच्या संख्येत १५ टक्क्यांनी घट झाली असुन मृत्यूंच्या संख्येत १ टक्क्याने घट झाली आहे.**

साधारणत: लवकर आलेला व दीर्घकालीन असलेला पावसाळा, अतिवृष्टी, वाढलेली वाहतुकीची तीव्रता तसेच महामार्गांवर वाढलेले प्रवासाचे तास हे रस्ते अपघात व मृत्यूची जोखीम वाढवणारे घटक असतांनाही नागपुर ग्रामीण जिल्हयात उपाययोजनांच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे रस्ते अपघातांतील मृत्यु आणि जखमींच्या संखेत घट झाली आहे.

## अवैधरित्या अंमली पदार्थ ( डोडा पावडर) बाळगुन विक्री करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, २० किलो डोडा पावडर जप्त नागपूर ग्रामीण पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन मौदा** :— दिनांक २२/१२/२०२५ रोजी अंमली पदार्थ विरोधी कारवाई पथक पेट्रोलींग करीत असतांना असतांना गुप्त बातमीदाराने खात्रीशीर माहीती दिली की, मालवा पंजाब धाबा येथे **असलम प्यारा खान, वय २१ वर्ष, रा. बरहमपुर लुधियाना, ह. मु. मालवा पंजाब धाबा, वडोदा, ता. कामठी,जि. नागपुर** हा आपल्या धाब्यामध्ये डोडा पावडर या अंमली पदार्थाची विक्री करीत आहे. नमुद पथकाने सदर माहीती मौदा पोलीसांना देत मौदा पोलीसांसह सयुंक्तीक कारवाई करत मिळालेल्या माहीतीच्या आधारे घटनास्थळी जावुन सापळा रचुन आरोपी नामे **असलम प्यारा खान, वय २१ वर्ष, रा. बरहमपुर लुधियाना, ह. मु. मालवा पंजाब धाबा, वडोदा, ता. कामठी** याला ताब्यात घेतले. आरोपीच्या धाब्याची कायदेशीररित्या पंचासमक्ष झडती घेतली असता डोडा पावडर अंमली पदार्थ मिळुन आला. **पोलीसांनी नमुद आरोपीच्या ताब्यातुन** १) अंमली पदार्थ डोडा पावडर वजन २०.४४० कि. ग्रॅ. किंमती ३,०६,६००/— रुपये २) बजाज कंपनीची व्हि १२ विक्रांत मोटरसायकल क्र. एम एच—४०/बी डी—०९२९ किंमती ५०,०००/—रुपये आणि ३) एक अॅड्रॉईड मोबाईल किंमती १५,०००/—रुपये असा एकुण ३,७१,६००/— रूपयांचा मुद्देमाल आरोपीकडुन जप्त करण्यात आला आहे.

**नमुद प्रकरणी आरोपी नामे असलम प्यारा खान, वय २१ वर्ष, रा. बरहमपुर लुधियाना, ह. मु. मालवा पंजाब वडोदा, ता. कामठी याच्याविरूद्ध पोलीस स्टेशन मौदा येथे एन. डी. पी. एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपीला अटक**

करण्यात आली असुन नमुद आरोपी हा दिनांक २४/१२/२०२५ रोजी पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मध्ये आहे. गुन्हयाचा पुढील तपास मौदा पोलीस करीत आहेत.



## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद २९ गोवंश जनावरांची सुटका,बेला पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन बेला** :— दिनांक २३/१२/२०२५ रोजी बेला पोलीसांना माहीती प्राप्त झाली की, अवैधरित्या गोवंश जनावरांची वाहतुक केली जात आहे. अशी माहीती मिळताच पोलीसांनी सदर वाहन शोध कामी पेट्रोलींग केली असता मौजा साल्लेभट्टी बस स्टॉप शिवारात एक संशयीत टाटा कंपनीचे आयशर क्र. एम एच ३५ ए. जे २०१६ हे वाहन दिसुन आले. पोलीसांना पाहुन सदर वाहन चालकाने त्याचे वाहन बस स्टॉप जवळील जंगलात वळविले पोलीसांनी नमुद वाहनाचा पाठलाग केला असता आरोपी वाहन सोडून पळुन गेले. पोलीसांनी पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये २९ गोवंश जनावरे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन,शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. **पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून एक टाटा कंपनीचा आयशर क्र. एम एच ३५ ए. जे २०१६ किंमती १५,००,०००/— रूपये आणि २९ गोवंश जनावरे किंमती २,५६,००० /— रूपये असा एकुण किंमती १७,५६,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला.**

नुमद प्रकरणी वाहन चालक आणि मालक आरोपीतांविरूध्द प्राण्यांचा छळ प्रतिबंध अधिनियम, महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम ,भान्यासं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणारे तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ११ गुन्हे नोंद

दिनांक २२/१२/२०२५ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू असा एकुण ११,८९०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

पोलीस स्टेशन वेलतूर येथे ०१ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन केळवद येथे ०१ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन सावनेर येथे एकुण ०४ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन काटोल येथे ०१ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन जलालखेडा येथे एकुण ०२ गुन्हे नोंद आहे. पोलीस

स्टेशन बोरी येथे ०१ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन मौदा येथे ०१ गुन्हा नोंद आहे. महाराष्ट्र दारू बंदी अधिनियम अन्वये एकुण ११ गुन्हे नोंद केले आहे.

**सदर कारवाईत १०९२० मिली देशी दारु, ७२ लीटर मोहाफुल दारू असा एकुण ११,८९०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नाशवंत मुद्देमाल पंचनामा कारवाई करून नष्ट करण्यात आला आहे.**

## नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७१० रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक २३/१२/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २१ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. एकुण ७१० आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुटिबोरी येथे ३३ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण ९७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३८ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे ३५ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २७ आणि पोलीस स्टेशन वेलतुर ३० आरोपी अशा एकुण १३० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ४५ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३२ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३१ आरोपी अशा एकुण १३६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३४ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे २७ आरोपी अशा एकुण ६१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ४९ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३१ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २१ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे येथे २४ आरोपी अशा एकुण १२५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ५१ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ४८ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३२ आरोपी अशा एकुण १६१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**(सर्व ६ उपविभागातील सर्व २१ पोलीस स्टेशन येथे एकुण ७१० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे. )**



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने